# N.S.S Special Winter Camp Report

**Camp Date :** 07 Mar. 2022 to 13 Mar. 2022

**Camp Venue :** Shri Vitthal Temple,Balade,Tal Shirpur,Dist Dhule


**Prof. G.K.Bide**
N.S.S.P.O.

**Dr.D.R.Patil**
Principal


R.C.Patel Educational Trust's
**R. C. Patel Arts Commerce and Science College, Shirpur**


N.S.S.

# रा.से.यो.विशेष हिवाळी शिबीर अहवाल




आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे

**आर.सी.पटेल**

**कला,वाणिज्य व विज्ञान**

**महाविद्यालय,शिरपूर**

**शिबीर कालावधी :** ०७ मार्च २०२२ ते १३ मार्च २०२२

**शिबीराचे स्थळ :** बाळदे ता.शिरपूर जि.धुळे

**प्रा.जी.के.बिडे** **डॉ.डी.आर.पाटील** रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्राचार्य

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर अहवाल

या वर्षी आर.सी.पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालयाच्या रासेयो एकाकास २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षास २५० नियमित विद्यार्थी व १२५ विशेष हिवाळी शिबिरार्थी विद्यार्थी अशी परवानगी विद्यापीठाकडून मिळाली.या वर्षी विशेष हिवाळी शिबीर घेणेसाठी मौजे. बाळदे ता. शिरपूर येथे शिबीर घेण्यासाठी विद्यापीठाने परवानगी दिली.माननीय प्राचार्यांच्या सहमतीने शिबिराचा कालवधी दि.०७/०३/२०२२ ते १३/०३/२०२२ असा ठरविण्यात आला.

या वर्षी विद्यापीठाने ठरविल्या प्रमाणे *"माझे गाव कोरोनामुक्त गाव"* हि थीम घेऊन विद्यापीठ व महविद्यालयाच्या पूर्व परवानगीने मौजे:बाळदे येथे सात दिवसाचे निवासी शिबीर घेण्याचे ठरले. शिबिरासाठी आवश्यक ती पूर्वतयारी, विद्यापीठाने ठरविलेल्या विषयानुसार वक्त्यांचे विषय व वक्ते यांचे नियोजन, कार्यक्रम पत्रिका छपाई, मंडप, ध्वनी प्रक्षेपक, स्वयंपाकी, किराणा, भाजीपाला यांचे नियोजन करण्यात आले.

निवडक स्वयंसेवकांना घेऊन दि.०६/०३/२०२२ रविवार रोजी सर्व साहित्य खाजगी वाहनाने बाळदे येथे नेण्यात आले. विठ्ठल रुख्मिणी मंदिराच्या परिसरात निवासी शिबीर आयोजित केले होते. मंदिराचा परिसर स्वच्छ करून साफसफाई करण्यात आली. पाण्याची सोय करण्यात आली. दि. दि.०७/०३/२०२२ रोजी उद्घाटनाची तयारी प्रा. गोपाल बिडे, प्रा. आर.पी.महाजन, कार्यक्रम अधिकारी आणि संघ व्यवस्थापक यांनी केली.

दि दि.०६/०३/२०२२ रविवार रोजी ठिक ८ वाजता शिबिरार्थी विद्यार्थांचे बाळदे येथे आगमन झाले.विद्यार्थांना आवश्यक त्या सूचना देउन गट पाडून संपूर्ण तयारी करण्यात आली. उद्घाटनाचा कार्यक्रम ठिक १० वाजता नियोजित वेळेवर सुरु करण्यात् आला. महिला दिनानिमित्तचे औचित्य साधून कार्याक्रमाचे उद्घाटीका सौ.मयुरी संजय पाटील या होत्या. कार्यक्रमास विशेष अतिथी श्री.संभाजी पाटील (मा.आमदार,शिरपूर),श्री.शांतीलाल पाटील(मा.संचालक,कृ.उ.बा.स.,शिरपूर), श्री निम्बाजी पाटील(मा.मुख्याध्यापक,पळासनेर), श्री.संजय पाटील(चेअरमन,वी,का,सोसायटी,शिरपूर) ,गुलाब पाटील(उपसरपंच,बाळदे) ,रामचंद्र पाटील (मा.मुख्याध्यापक,शिरपूर)व अन्य सन्माननीय मान्यवर उपस्थित होते. कार्याक्रमचे अध्यक्ष मा. उपप्राचार्य डॉ. आर.डी.जाधव होते. दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन करून कार्याक्रमचे उद्घाटन झाले. सर्व अतिथींचे स्वागत न्यापकीन , गुलाब पुष्प देवून करण्यात आले.श्री.संभाजी पाटील यांनी विद्यार्थांच्या विकासात रा. से यो. चे महत्व विषद केले. म. प्राचार्यांनी रासेयो मुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरूकता व मानसिकता कशी बदलते या वर भर दिला. कार्यक्रमास दैनिक पुण्यनगरीचे , देशदूत यांचे वार्ताहर श्री किशोर माळी उपस्थित होते.उद्घाटन सोहळा उत्कृष्टरित्या पार पडला. कार्यक्रमानंतर सर्व अतिथी व शिबिरार्थी यांनी स्वादिष्ठ वांग्याची भाजी व पोळीयांचा आस्वाद घेतला.

दुपारच्या सत्रात डॉ.ए.जी.सोनवणे (विभागीय कार्यक्रम अधिकारी)यांचे स्वच्छ भारत अभियान या विषयावर व्याख्यान होते. सरांनी आपला विषय मांडून विद्यार्थांशी हितगुज केली. सरांनी या संबंधी महत्वपूर्ण मार्गदर्शन शिबिरार्थींना दिले. संद्याकाळी विविध खेळ व गटचर्चा झाली. रात्री ८ वाजेला जेवण आटोपून सांकृतिक कार्यक्रम घेतले.रात्री च्या जेवणासाठी बी.पी.एल. कुटुंब श्री रामदास भिल व परिवार यांस आमंत्रित केले होते. रात्री १० ला दिप् मालवण करून सर्व शिबिरार्थी निद्राधीन झाले.

दि ०८/०३/२०२२ रोजी नित्य कार्यक्रम आटोपून विद्यार्थी प्रभातफेरी साठी तयार झाले.टाळ मृदंग यांच्या संगतीने “ जय जय राम कृष्ण हरी” चाल धरत संपूर्ण गावात प्रभात फेरी काढली. यात गावकरी देखील सहभागी झाले. हा सकाळचा दैनंदिन कार्यक्रम सात दिवस चालला. सकाळी योगासने झाली, सकाळचा नाश्ता व चहा आटोपून शिबिरार्थी श्रमदानासाठी सज्ज झाले. गट नुसार साहित्य वाटप करण्यात आले. व गट गटाने मंदिराची साफसफाई करण्यात आली. सदर श्रमदान १२.३० पर्यंत चालले. दुपारी १२.३० ला स्नानादी आटोपून विद्यार्थांनी रूचकर भोजनाचा आस्वाद घेतला.दुपारच्या सत्रात प्रा. उमेशचंद्र पाटील यांचे स्त्री पुरूष समानता या विषयावर व्याख्यान होते.युवापिढी समाजाला घडवू शकते.असे त्यांनी म्हटले. सदर व्याख्यान दोन तास चालले. विद्यार्थांनी विचारलेल्या प्रश्नांची छान उत्तरे दिली.सायंकाळी गट चर्चा झाली विविध खेळ व संगीत संध्या झाली. रात्री जेवणांत छोले पुरी मसालेभात चा बेत होता. विद्यार्थांनी आस्वाद घेतला. अहवाल लेखनानंतरदिप् मालवण केले.

दि. ०९/०३/२०२२ रोजी सकाळचा नित्य कार्यक्रम आटोपून विद्यार्थी प्रभातफेरी साठी तयार झाले. प्रभातफेरी नंतर योगासने झाली. आज नसत्या साठी उपमा बनवलेला होता. सकाळी ८.०० वाजता चहा

नाश्ता आटोपून विद्यार्थी श्रमदानासाठी तयार झाले. आज सर्व गट मंदिराचा उरलेल्या परिसराची साफसफाई करण्यास तयार झाले. तेथील विटा, उचलून रचणे, गवत साफ करणे, जामिन सपाट करणे , रेतु उचलून ट्रक्टर मध्ये भरून देणे, संपूर्ण परिसर स्वच्छ करणे इ. कामे सर्व विद्यार्थांनी केली दु. १.०० वाजेपर्यंत श्रमदान चालले. दुपारी भोजनानंतर विद्यार्थांनी थोडी विश्रांती घेऊन व्याख्यान सत्रासाठी सज्ज झाले. दुपारच्या बौद्धिक सत्रात आज डॉ.मनोज निकम यांना आरोग्य: अवयव दान श्रेष्ठ दान या विषयावर व्याख्यानास बोलविले होते. डॉ.मनोज निकम यांनी अवयव दानाचे महत्व विशद केले. कोणते अवयव दान केले जातात. ब्रेन डेड व्यक्तींचे अवयव, यासाठी पुढे सरसावलेल्या संस्था या वर सखोल मार्गदर्शन केले. सदर विषय सरांचा संशोधनाचा असल्यामुळे सरांनी या विषयाच्या विविध पैलूंवर सखोल माहिती शिबिरार्थींना दिली.डॉ.निकम यांनी अतिशय सोप्या भाषेत आपला विषय मांडला. विद्यार्थांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. डॉ.पी.वाय.मगरे यांनी दुसर्या सत्रात आल्यावर सरांचासत्कार प्रा बिडे सरांनी केला.सरांनी जल व्यवस्थापन या विषयावरक मार्गदर्शन केले.त्यानंतर विद्यार्थांनी गट चर्चा केली.सायंकाळी विद्यार्थ्यानीसांगिक खेळ केले. रात्रीच्या रुचकर भोजना नंतर अहवाल लेखन करून दिवसाची सांगता दीप मालवण करून केली.

दि. १०/०३/२०२२ ची सुरुवात नित्यकाम आटोपून प्रभात फेरीने झाली. सकाळी योगासने आटोपून सकाळी ८.०० ला शिबिरार्थी चहा व नाश्ता साठी तयार होते . आज मठाची उसळ होती सर्वांनी त्याचा आस्वाद घेत श्रमदानाची तयारी केली. आजचे श्रमदान टप्प्या-टप्प्यात होते. शिबिरार्थीचे गटात विभागून श्रमदानास सुरुवात केली पहिल्या गटाने ग्राम स्वच्छता करून गटारी स्वच्छ केल्या. दुसऱ्या गटाने जि.प.शाळेचा मागील परिसर जो खूपच खराब झालेला होता त्याची स्वच्छता करण्यासाठी झाडे कापली, गवत उपटले, संपूर्ण परिसर पिंजून काढत स्वच्छ केला. संपूर्ण कचरा बाहेर फेकला. सदर श्रमदानास तीन तास लागले. दुपारच्या रुचकर भोजना नंतर शिबिरार्थीनी थोडा विश्राम करून दुपारच्या बौद्धिक सत्राची तयारी केली.दुपारच्या सत्रात डॉ. राजू पवार यांनी स्वच्छतेचे महत्व सांगितले.व आज सायंकाळचे विविध खेळ खेळून रात्रीच्या भोजन लवकर आटोपून घेतले कारण रात्री ठिक. ८.०० वाजता स्वच्छतेविषयीचे व अभिप्रेरनात्मक चलचित्र दाखविण्याचे आयोजन केले होते. त्यासाठी गावकरीना आमंत्रित करण्यात आले होते. ठिक ८ वा. कार्यक्रम सुरु झाला आलेल्या निमंत्रितांचे स्वागत प्रा. वंदना पाटील यांनी केले. व सर्व प्रथम जनजागृती करण्यात आली. नंतर विविध विषयावर बाकी गावकऱ्यांनी आपले विचार मांडले त्यात स्त्री आरोग्य समस्या, ऊर्जा बचत, बेटी बचाओबेटी पढाओ इ. वर चर्चा झाली जवळ जवळ दोन तास हा जनजागृतीचा कार्यक्रम चालला. कार्यक्रमाची सांगता चहापानाने झाली. रात्री १०.३० ला अहवाल लेखन झाल्यावर दीप मालवण केले

दि. ११/०३/२०२२ ची सुरुवात " जय जय राम कृष्ण हरी" हया गजराने प्रभात फेरी झाली. प्रभात फेरीने झाली. त्या नंतर योगासने आटोपून शिबिरार्थी चहा व नाश्ता साठी तयार झाले. आज स्वयंपाकी बाबांनी पोहे तयार केले होते सर्व शिबिरार्थीनी चहा नाश्ता घेऊन श्रमदानासाठी तयार झाले. आजचे श्रमदान हे

दोन टप्प्यात होते. काही गटांनी बी. पी एल  वस्ती साफ सफाई तर काही गटांनी  ग्राम सफाई,शाळेचा, गटारी स्वच्छ करणे असा होता, सर्व साहित्य घेऊन शिबिरार्थी श्रमदानास निघाले. सर्वी कामे विभागली गेली असल्यामुळे अतिशय शिस्तीत संपूर्ण श्रमदान करून, सर्व परिसर स्वच्छ  केला. सदर श्रमदानास तीन तास लागले. दुपारच्या रुचकर भोज नंतर शिबिरार्थीनी थोडी विश्रांती घेऊन दुपारच्या बौद्धिक सत्राची तयारी केली.

आजच्या पहिल्या सत्रात प्रा. डॉ. विजय गर्गे यांना निमंत्रित केले होते. सरांना साहित्य व समाज  हा विषय दिला होता. सरांनी आजच्या जीवनांत साहित्याचे अनमोल योगदान व आजचा तरुण या विषयी विद्यार्थ्याशी हितगुज केली. तसेच साहित्याचा वापर कसा  व कुठे करावा या संबंधी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. आजच्या दुसऱ्या बौद्धिक सत्रात.डॉ.आर.व्ही.सोनार यांना निमंत्रित केले होते. सरांना बेटी बचाओ बेटी पढाओ हा विषय देण्यात आला होता .आजच्या युगात मुलींचे महत्व व त्यांच्या शिक्षणामुळे येणारी पिढी कशी स्वयंपूर्ण होते या वर सरांनी भर दिला. त्या नंतर सरांनी आपल्या भात्यातील कवितांनी शिबिरार्थीना मुग्ध केले.सदर व्याख्यान दीड तास चालले. हे सत्र आटोपल्यावरजी.प.शाळा बाळदे येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली शाळेतील मुलांना पेन्सिल व चोकलेट देऊन समारोप झाला.त्यानंतर सायंकाळी ५.३० वाजता “बेटी बचाव बेटी पढाव” या मोहिमेचा एक भाग म्हणून गावात साक्षरता रैली चे आयोजन केले होते. सदर रैली संपूर्ण गावात निघाली. सदर मोहीम दोन तास चालली.  रात्रीच्या भोजना नंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाला. रात्री अहवाल लेखन झाल्यावर दीप मालवण केले.

दि १२/०३/२०२२ ची सुरुवात सकाळी ५.३० ला प्रभात फेरीने झाली. योगासने व व्यायाम आटोपून स्नानादी करून विद्यार्थी चहा नाष्ट्यासाठी तयार झाले. चहा नाश्ता आटोपून विद्यार्थी  श्रमदानास तयार झाले. श्रमदान हे दोन टप्प्यात होते. काही गटांनी श्रमदान हे गावातील अमरधाम  परिसरात साफ सफाई केली. नंतर संपूर्ण परिसर स्वच्छ केला. या श्रमदानास तीन तास लागले.दुपारी सर्वांसाठी गोबी बटाटे टमाटे मिक्स भाजी व पोळी चा बेत होता शिबिरार्थींनी स्वादिष्ट भोजनावर ताव मारला. थोड्या विश्रांतीनंतर शिबिरार्थी दुपारच्या बौद्धिक सत्रासाठी तयार झाले. आजच्या बौद्धिक सत्रात श्री.गोपाल वान्खेडेकर यांचे , उपजिल्हा रुग्णालय, शिरपूर यांचे एच. आय. व्ही. वर बोलू काही या विषयावर व्याख्यान होते. सरांनी अतिशय सुंदर शब्दात आपला विषय मांडला व शिबिरार्थींच्या सर्व शंका व प्रश्नांचे उत्तरे दिली.एड्स कशा मुळे होतो. त्याची लक्षणे, विविध चाचण्या या विषयी सखोल मार्गदर्शन केले. एड्स झाल्यावर व्यवस्थित ओषधउपचाराने व्यक्ती चांगले आयुष्य कसे जगू शकतो यावरही सरांनी भर दिला. आजचे दुसरे व्याख्यान कॉटेज हॉस्पिटल शिरपूरचे श्री. ऋषीराज महाजन  यांचे सिकल सेल:जनजागृती या विषयावर होते. त्यांनी या विषयाची मांडणी व विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांनी सिकलसेल ची संकल्पना सांगून सिकलसेल होऊ नये याकरिता मार्गदर्शन केले.सरांनी आपला विषय अतिशय सोप्या भाषेत

विद्यार्थ्यांना सांगितला व  शिबिरार्थी विद्यार्थांना असलेल्या शंकांचे निरासन केले.  शिबिरार्थींच्या विचारलेल्या प्रश्नांचे निरसन केले.सायंकाळी  शिबिरार्थीनी विविध खेळ केले. गटचर्चा रंगली. रात्रीच्या भोजनात कडी खिचडी असा बेत होता शिबिरार्थीनी त्याचा आस्वाद घेतला.रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमानंतर दीप मालवण केले.

दि. १३/०३/२०२२ ची सुरुवात प्रभातफेरी ने झाली. आज समारोपाचा दिवस होता.  योगासने आटोपून विद्यार्थी चहा नाष्ट्यासाठी तयार झाले. ते आटोपून  समारोपाच्या कार्याक्रमाची तयारी केली.  सकाळी १०.०० वाजेच्या बौध्दिक सत्रात डॉ.नागोराव डोंगरे शिरपूर रासेयो  विभागीय अधिकारी  यांचे सकारात्मक विचार या विषयावर व्याख्यान आयोजित होते. सर्व शिबिरार्थी व्याख्यानासाठी तयार झाले सरांनी विविध पैलूवर छान प्रकाश टाकला विद्यार्थी ही समरस झाले. सर्वांनी आपल्या शंका उपस्थित केल्या. सरांनी सर्व शंकांचे निरसन केले. दुपारच्या भोजनात वरण बट्टी ,मठाची भाजी व जिलेबी  असा बेत होता. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, रासेयो जिल्हा विभागीय समन्वयक डॉ प्रदीप पाटील, गावातील सर्व मान्यवर व्यक्ती समारोपासाठी हजर होते. दुपारच्या भोजनाचा आस्वाद घेतल्या नंतर समारोपाचा कार्यक्रम ठीक २.०० वाजता सुरु झाला. समारोपाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए.एम.पाटील होते. कार्यक्रमासाठी गावाचे सरपंच, ग्रामसेवक,पोलीस पाटील, उप सरपंच,जिल्हा समन्वयक डॉ.आढावे सर,डॉ.बाविस्कर,श्री.जितेंद्र पाटील,श्री.निम्बाजी पाटील,श्री लक्ष्मण पाटील माजी कार्यक्रम  अधिकारी  प्रा.माहेश्वरी व सर्व सन्माननीय मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. उपप्राचार्यांचा, व सर्व आमंत्रित मान्यवरांचा सत्कार  कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंद ज. माहेश्वरी यांनी केला. त्यानंतर कार्यक्रमाचे अहवाल वाचन प्रा. गोपाल बिडे यांनी केले. शिबिरार्थी विद्यार्थ्यांपैकी वासुदेव पाटील,सचिन राजपूत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गावाचे प्रतिनिधी म्हणून माजी मुख्याध्यापक  यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरार्थींची शिस्त व आचरण गावकरींना भावले.तद्नंतर रासेयो जिल्हा विभागीय समन्वयक डॉ.पाटील सरांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मा. उपप्राचार्यांनी गावकरींना धन्यवाद केले. व शिबिरार्थीनी आपल्या भावी आयुष्यात रा. से. यो. ची शिस्त अंगीकारावी असे सांगितले.मा. प्राचार्यांनी रा से यो मुळे सामाजिक बांधिलकी कशी जोपासावी हे सांगून आम्हाला संबोधिले.कार्यक्रमचे सूत्रसंचालन डॉ.अनिता जाधव यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.पी.महाजन यांनी केले. तसेच शिबिराच्या यशस्वीतेसाठी ज्या गावकरींनी अनमोल सहकार्य केले त्यांचा सत्कार करून आभार मानले. कार्यक्रम संपल्यावर सर्व साहित्यांची जुळवाजुळव करून सर्व  सामान खाजगी वाहनात ठेवले. नंतर सर्व शिबिरार्थी यांनी महाविद्यालयाकडे प्रस्थान केले. सर्वांसाठी हा एक चांगला व नवा अनुभव होता. संपूर्ण शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाले.

N.S.S.

**श्री.जी.के.बिडे**

रासेयो कार्यक्रम अधिकारी

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीराची कार्यक्रम पत्रिका



**दैनंदिनी**

| | | |
|---|---|---|
| सकाळ – | ५.०० | जागर |
| | ५.३० ते ६.१५ | प्रार्थना,ध्यानधारणा,योगा,सदृढ आसने (FIT) (नागरीकासह) |
| | ६.३० ते ६.५५ | चहापान व अल्पोपहार |
| | ७.०० ते १०.०० | श्रमदान |
| | १०.०० ते ११.२५ | स्वयंस्वच्छता |
| | ११.३० ते दु.२.०० | भोजन व विश्रांती |
| दुपारी – | २.१५ ते ३.०० | गीतमंच |
| | ३.०० ते ३.४५ | व्याख्यानसत्र–१/३/५/७/९ |
| | ३.४५ ते ४.३० | व्याख्यानसत्र–२/४/६/८/१० |
| सायंकाळी – | ४.४५ ते ५.१५ | चहापान |
| | ५.२० ते ७.०० | मैदानीखेळ व गटचर्चा |
| | ७.१५ ते ८.०० | भोजन |
| रात्री – | ८.१५ ते ८.०० | सामाजीक विचारमंथन |
| | ९.४५ ते ९.५० | प्रार्थना |
| | ९.५५ | दिपमालवण |

*** विविध उपक्रम ***

शौचालय निर्मितीसाठी व जनजागृतीसाठी महिला मेळावा,उर्जा बचत जनजागृती करणे, जलसंधारण बंधारा बांधणे,आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण,तंबाखू मुक्त व टिबी मुक्त भारत जनजागृती,दररोज एका सांजेला एका BPL कुटूंबाला सहभोजनासाठी आमंत्रित करणे इ. कार्यक्रम आयोजित केले जातील.

*** विनित ***

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.जी.के.बिडे<br>कार्यक्रम अधिकारी<br>राष्ट्रीय सेवा योजना | डॉ.आर.डी.जाधव<br>उपप्राचार्य | डॉ.ए.एम.पाटील<br>उपप्राचार्य | डॉ.डी.आर.पाटील<br>प्राचार्य |

प्रति, Book Post

मा.श्री./सौ. ____________________

Pin

सरस्वती,शिरपूर २५५८०७

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संलग्नित–

आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट

**आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरपूर, जि.धुळे**

**राष्ट्रीय सेवा योजना**

NOT ME BUT YOU

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्ष स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव**

**"माझेगाव कोरोना मुक्तगाव"**

शिक्षण,आरोग्य,पर्यावरण,आपत्ती व्यवस्थापन,ग्रामीण विकास व पाणी व्यवस्थापन

**शिबीर कालावधी** :– ०७ मार्च ते १३ मार्च २०२२

**उद्‌घाटन सोहळा** :– ०८ मार्च २०२२ सकाळी ११.०० वा.

**समारोप समारंभ** :– १३ मार्च २०२२ दुपारी ३.०० वा.

*** स्थळ ***

**विठ्ठल मंदिर**

बाळदे ता.शिरपूर जि.धुळे

महाशय,

क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व आर.सी.पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शिरपूर जि.धुळे यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबीर,मौजे वाळदे ता.शिरपूर जि.धुळे येथे आयोजित केलेले आहे.

*** उद्घाटन सोहळा ***

मंगळवार दि.०८/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.

*** उद्घाटक ***
मा.श्री.संभाजीराव हिरामण पाटील
मा.श्री.शांतीलाल गोरख पाटील
मा.श्री.निंबाजी माधवराव पाटील
अल्पसंख्यांक व दिव्यांग विद्यार्थी

*** अध्यक्ष ***
मा.प्राचार्य.डॉ.डी.आर.पाटील

**वैशिष्ट्ये** संविधान ते राष्ट्रीय समरसता, स्वच्छ भारत अभियान आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन, ग्रामिण विकास, राष्ट्रीय शिक्षण हक्क

*** समारोप समारंभ ***
रविवार दि.१३/०३/२०२२
रोजी दुपारी ३.०० वा.

*** समारोपकर्ते ***
मा.डॉ.नागोराव डोंगरे
(रा.से.यो.शिरपूर तालुका समन्वयक)

*** प्रेरणा स्त्रोत ***

मा.श्री.अमरिशभाई पटेल (माजी शालेय शिक्षण मंत्री,महा.राज्य)
मा.सौ.जयश्रीबेन पटेल (नगराध्यक्षा,शि.व.न.प.शिरपूर)
मा.श्री.भुपेशभाई पटेल (अध्यक्ष,आर.सी.पटेल.एज्यु.ट्रस्ट)
मा.श्री.राजगोपाल भंडारी (उपाध्यक्ष शिरपूर एज्यु.सोसायटी)
मा.श्री.चिंतनभाई पटेल (उद्योगपती)

*** प्रमुख अतिथी ***

मा.श्री.डॉ.ए.एम.पाटील, (उप प्राचार्य-आर.सी.पटेल महाविद्यालय,शिरपूर)
मा.श्री.डॉ.आर.डी जाधव, (उप प्राचार्य-आर.सी.पटेल महाविद्यालय,शिरपूर)
श्री.नानासो.संभाजीराव हिरामण पाटील (मा.आमदार शिरपूर)
श्री.आबासो. साहेबराव बळीराम पाटील (माजी ग्राम विस्तार अधिकारी)
श्री.अण्णासो.निंबाजी माधवराव पाटील (मा.संचालक शि.सा.का.शिरपूर)
सौ.विठ्ठबाई निंबा पाटील (सदस्य पं.स.)
श्रीमती.ताईसो.मंदाबाई गरबड भिल (सरपंच वाळदे)
श्री.निंबाजी तोताराम पाटील (उपसरपंच वाळदे)
श्री.विठ्ठल महारू पाटील (पो.पाटील,वाळदे)
श्री.न्हानभाऊसो.जितेंद्र संभाजीराव पाटील (मा.सदस्य जि.प)
श्री.भैय्यासो.संजय पंडीत पाटील (चेअरमन वि.का.सोसायटी.वाळदे)

*** दैनंदिन कार्यक्रम ***

मंगळवार दि.०८/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. उद्घाटन समारंभ संपन्न होऊन दैनंदिन कार्यक्रमात खालील मान्यवरांचे वैचारिक प्रबोधन लाभणार आहे.

**"अमृताचे बोल"**

| दिनांक | वेळ | विषय | वक्त्यांची नांवे |
|---|---|---|---|
| ०७/०३/२०२२ | २.३० ते ३.३०<br>३.३० ते ४.३० | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व तरूणां पुढील आव्हाने | श्री.डॉ.रजनिकांत सोनार |
| ०८/०३/२०२२ | २.३० ते ३.३०<br>३.३० ते ४.३० | स्त्री - पुरूष समानता<br>आर्थिक स्वातंत्र्य | श्री.उमेशचंद्र पाटील<br>डॉ.लक्ष्मीकांत इक्वार |
| ०९/०३/२०२२ | २.३० ते ३.३०<br>३.३० ते ४.३० | वित्तीय साक्षरता<br>स्पर्धा परिक्षा पुर्व तयारी | डॉ.अनिल सोनवणे<br>डॉ.दिपक बाविस्कर |
| १०/०३/२०२२ | २.३० ते ३.३०<br>३.३० ते ४.३० | स्वच्छ भारत अभियान<br>योगाभ्यास | डॉ.राजु पवार<br>श्री.मिलिंद सोनवडे |
| ११/०३/२०२२ | २.३० ते ३.३०<br>३.३० ते ४.३० | खेळ विचारांचा<br>मैत्री एक वरदान | सौ.मानसी वैद्य<br>डॉ.विजय गर्गे |
| १२/०३/२०२२ | २.३० ते ३.१०<br>३.१० ते ३.५०<br>३.५० ते ४.३० | शेती विषयक जोड व्यवसाय<br>वेळेचे व्यवस्थापन<br>शेती क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी | डॉ.नितीन मिसाळ<br>श्री.राजेंद्रगीडा पाटील<br>डॉ.उपासना रत्नकारण |
| १३/०३/२०२२ | १०.०० ते ११.०० | सकारात्मक विचार | डॉ.नागोराव डोंगरे |

*** स्नेहांकित ***

प्रा.जी.के.खिडे (कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.)
प्रा.आर.पी.महाजन (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.)
प्रा.डॉ.अनिता जाधव (महिला कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.)

*** सहकार्य ***

वाळदे ग्रामस्थ
जि.प.शाळा वाळदे मुख्याध्यापक, व्यवस्थापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी.

**आर.सी.पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,शिरपूर**
प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक बंधू-भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी.
* रा. से. योजनेच्या आजी - माजी विद्यार्थी

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीराची क्षणचित्रे

Inauguration Program of NSS Winter Camp at Balade




Prof.Vijay Garge Creating awareness on “Beti bachao beti Padhao” in NSS Winter Camp at Balade




Swacchta Abhiyaan in NSS Special Winter Camp at Balade




Rangoli Drawn by Volunteer in NSS Special Winter Camp

Swacchta Abhiyaan in NSS Special Winter Camp at Balade 1






Swacchta Abhiyaan in NSS Special Winter Camp at Balade 2,3,4









News Published in Deshonnati Dainik about NSS

# देशोन्नती २३-३-२०२२

## पटेल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनातर्फे शिबीर

देशोन्नती वृत्तसंकलन...



**शिरपूर** येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना तर्फे विशेष हिवाळी शिबीर बाळदे येथे सुरु झाले.

या शिबिराचे उद्घाटन साहेबराव बळीराम पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी शांतीलाल गोरख पाटील (माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती शिरपूर), निंबाजी माधवराव पाटील (माजी संचालक शिरपूर साखर कारखाना शिरपूर), निंबाजी तोताराम पाटील , विठ्ठल पाटील, रामचंद्र यशवंत पाटील, सौ. लताबाई भटू पाटील, गुलाब बाबुलाल पाटील (उपसरपंच बाळदे), संजय पंडित पाटील (चेअरमन वि. का. सोसायटीबाळदे) उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आर सी पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील यांनी भूषविले. उद्घाटनपर भाषणात विठ्ठल पाटील यांनी देशसेवा, राष्ट्रप्रेम, साधी राहणी, जीवनातील दिनचर्या, व्यसनमुक्ती या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. ए. एम. पाटील यांनी श्रम संस्कार कसे रुजविले जातात, विवाह अवस्थेत कसे असले पाहिजे, देशाची प्रगती याबाबत माहिती दिली. उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव यांनी राष्ट्रीय योजना कशासाठी असते त्यासाठी काय केले पाहिजे ते सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिता जाधव (महिला कार्यक्रम, महिला राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी) यांनी केले. प्रास्ताविक गोपाल बिडे (राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी) यांनी केले तसेच कार्य तसेच पाहुण्यांचे आभार डॉ. जे. पी. महाशब्दे यांनी व्यक्त केले. उद्घाटनाप्रसंगी उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव, रासेयो विभागीय गोपाल बिडे, आर. पी. महाजन, डॉ. आर. व्ही. सोनार, डॉ. अनिता जाधव, डॉ. जे. पी. महाशब्दे, श्रीमती सपना येशी, राजश्री जाधव उपस्थित होते.

देशदूत २९-३-२०२२

## बाळदेत रासेयोचे शिबीर संपन्न



**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनातर्फे विशेष हिवाळी शिबीर नुकतेच बाळदे येथे झाले. शिबिराचे उद्घाटन साहेबराव बळीराम पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी शांतीलाल पाटील (माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, शिरपूर), निंबाजी पाटील (माजी संचालक, शिरपूर साखर कारखाना शिरपूर), निंबाजी पाटील (माजी मुख्याध्यापक स्वा. वि. मा. विद्यालय पळासनेर), विठ्ठल पाटील, रामचंद्र पाटील (मुख्याध्यापक बाळदे), सौ. लताबाई पाटील, गुलाब पाटील (उपसरपंच बाळदे), संजय पाटील (चेअरमन वि. का. सोसायटी बाळदे) उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आर सी पटेल महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील यांनी भूषविले.

**प्रा.जि.के.बिडे**

रासेयो कार्यक्रम अधिकारी

N.S.S.